# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 14.11.2024** **वार – गुरुवार**

---

**नेहरू जयंती**

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त आज पुण्यात ठीकठिकाणी त्यांना अभिवादन करण्यात आलं. पंडित नेहरू यांची जयंती बालदिन म्हणूनही साजरी केली जाते, त्यानिमित्त अनेक शाळांमध्ये, तसंच स्वयंसेवी संस्था संघटनांनी लहान मुलांसाठी विविध उपक्रमांचं आयोजन केलं आहे. आद्यक्रांतीगुरू लहुजी वस्ताद यांचीही आज जयंती आहे. त्या निमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि लहुजी वस्ताद यांना अभिवादन करण्यात आलं. समाजमनात क्रांतीची मशाल पेटवणारे आणि हजारो क्रांतिकारकांना घडविणारे लहुजी वस्ताद साळवे हे महान देशभक्त आणि खऱ्या अर्थाने क्रांतिकारकांचे स्फूर्तिस्थान होते असे मत जाधवर शैक्षणिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर यांनी मांडले. विद्यापीठामध्ये आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

**प्रचार**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला केवळ चार पाच दिवस शिल्लक राहिले असून पुणे शहर आणि जिल्ह्यात आता विविध पक्षांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे.चिंचवड विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल कलाटे यांच्या प्रचारासाठी पक्षाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रचार फेरी झाली. सांगवीच्या साई चौकातून या प्रचार फेरीला सुरुवात झाली आणि वाल्हेकर वाडी इथे समारोप झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबर भाजपा राज्यात चांगल्या प्रकारे काम करत असून विकसित महाराष्ट्रासाठी महायुती सरकार राज्यात पुन्हा आलं पाहिजे, प्रतिपादन गोवा राज्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत केलं. यावेळी त्यांनी केंद्र सरकार आणि राज्यातील महायुती सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली; आणि विरोधकांवर जोरदार टीकाही केली. गेल्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश विकासाच्या मार्गावर वाटचाल करत आहे, असं प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रमुख आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज पुण्यात केलं. महायुतीचे पुणे कॅंटॉन्मेंट मतदारसंघातील उमेदवार सुनील कांबळे यांच्या

प्रचारार्थ भिमशक्ती चौकात आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्राचर फेरीचं आयोजन करण्यात आलं होतं; त्यावेळी ते बोलत होते. विरोधक संविधानाच्या मुद्द्यावर समाजात चुकीची माहिती पसरवत आहेत. मात्र संविधान बदलणे शक्य नाही, हे आंबेडकरी समाजाला माहीत आहे; त्यामुळे आंबेडकरी समाज एकजुटीने महायुती सोबत आहे, असं रामदास आठवले म्हणाले. शिवाजीनगर मतदार संघातील महायुतीचे उमेदवार सिद्धार्थ शिरोळे यांच्या प्रचारासाठी आज दुचाकी फेरी देखील काढण्यात आली; यावेळीही रामदास आठवले उपस्थित होते. आम्ही अत्यंत ताकदीने तयारी केली आहे त्यामुळे आम्ही महाविकास आघाडीला विजय मिळू देणार नाही, असं आठवले यावेळी म्हणाले. काँग्रेस सरकारने हिमाचलच्या जनतेला आश्वासन देऊन ते सत्तेत आले पण गेल्या दोन वर्षात कोणत्याही आश्वासनाची पूर्तता केलेली नाही. असं हिमाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि विरोधी पक्ष नेते जयराम ठाकूर यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत सांगितलं. यावेळी कर्नाटकचे माजी उपमुख्यमंत्री डॉ. अश्वत्थ नारायण , कर्नाटकचे माजी मंत्री नारायण गौडा, भाजपाच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि तेलंगणा राज्यातील खासदार डी. के. अरुणा उपस्थित होते. हिमाचलमध्ये कॉंग्रेसला कोणत्याही आश्वासनाची अंमलबजावणी करण्यात न आल्याने जनतेत आक्रोश निर्माण झाला आहे. ही परिस्थिती महाराष्ट्रात येऊ नये; जनतेने काँग्रेसचा खरा चेहरा ओळखावा, असं जयराम ठाकूर म्हणाले.

**मतदार जनजागृती**

येत्या 20 नोव्हेंबरला होत असलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये मतदानाचा टक्का वाढावा आणि नागरिकांनी मोठ्या प्रमाणात निर्भयपणे मतदान करावं यासाठी पुणे जिल्हा प्रशासनाच्या वतीनं मतदार जनजागृती करण्यात येत आहे. कर्वेनगर आणि कोथरूड भागातील विविध ठिकाणी, चला करू मतदान, हे पथ-नाट्य सादर करण्यात आलं. या परिसरातील महत्त्वाच्या ठिकाणी तसंच महाविद्यालयांच्या प्रवेशद्वारा समोर असं 40 ठिकाणी हे पथ नाट्य सादर करण्यात आलं. यावेळी नवमतदार असलेल्या तरुणाईला, मतदानाचं महत्व पटवून देण्यात आलं. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळेतील 1100 हून अधिक पालकांनी आज शाळेत उपस्थित राहून मतदान करण्याची प्रतिज्ञा घेतली. शाळेच्या परिसरात विद्यार्थी आणि पालकांनी मानवी साखळी तयार करून परिसरातील नागरिकांमध्ये मतदानाविषयी जागृती केली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी सुमारे 1 हजार रिक्षांवर “मतदान अवश्य करा” असा संदेश असलेले फलक लावण्यात आले आहेत. निगडीच्या भक्ती शक्ती चौकातून आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते या या मतदान जनजागृती अभियानाची सुरुवात करण्यात आली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या कमाल तापमान तीस तर किमान तापमान 16 अंशांच्या आसपास राहणार असून आकाश दुपारनंतर ढगाळ राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**